**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act. 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

**Office of the Director Students' Development**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)

**Dr. Priya Gedam**

web: unigug.ac.in/gug.digitaluniversity.ac.in

**(I/c.) Director Students' Welfare**


दिनांक :०२/०६/२०२६

जा.क्र./विविवि/८९५/२०२६

प्रति,

मा.प्राचार्य,

संलग्नित सर्व महाविद्यालय/विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

**विषय:— आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२५—२६.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लेखनगुणांना व सृजनशिलतेला महाविद्यालयीन स्तरावर व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या लेखन कलेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विद्यापीठाद्वारे आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेचे आयोजन शैक्षणिक सत्र २०१३—१४ पासून सुरू करण्यात आले आहे. सदर वार्षिकांकाच्या प्रकाशनासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून प्राप्त वार्षिकांक शुल्काच्या रक्कमेतून आपल्या महाविद्यालयात वार्षिकांक प्रकाशित होणे अपेक्षित आहे.

प्रस्तृत स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकाला रू.७०००/— चे रोख बक्षिस तसेच द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकास रू. ५०००/— व ३०००/— तसेच दोन उत्तेजनार्थ रू. १०००/— प्रति पुरस्कार बक्षिस देण्यात येतील. सोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून पुरस्कृत महाविद्यालयाचा गौरव करण्यात येईल समान गुण प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकाना बक्षीस विभागून देण्यात येईल. वार्षिकांकाचे मुल्यांकन व गुणविभागणी खालील नियमाच्या आधारे करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**१.विद्यार्थ्यांचा सहभाग(गुण २०):—** यात फक्त वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थीनीचा सहभाग अपेक्षित आहे. महाविद्यालयातील सर्व विद्याशाखा आणि वर्ग यांचा सहभाग असावा. लेखन सर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीभूत असावे.

**२. रचनांचा आशय(गुण २०):—** वार्षिकांकात प्रकाशित मजकूर विद्यार्थी/विद्यार्थीनीचा असावा. प्राध्यापकांकडून लेखन अपेक्षा नाही. क्वचित लेखन प्रकाशित झालेच तर त्या लेखनाचे मुल्यांकन करण्यात येणार नाही. वार्षिकांकातील लेखन महाविद्यालयात अध्यापन होणाऱ्या भाषेतील असावे. मराठी, हिदी, इंग्रजी, संस्कृत व उर्दु आदि. गद्य—पद्यात्मक लेखनाचा दर्जा तपासताना त्यातील संपन्न आशयाचा विचार करण्यात येईल.

**३. रचनांची शैली(गुण २०):—** रचनाच्या विषयाची मांडणी शैलीदार असावी. विषय वाचकांपुढे ठेवताना शैली साधी व सरळ अनलकृत असावी अलंकारीत असल्यास कृत्रिम असू नये, तसेच अनुकरण असू नये.

**४. अंकाची निर्मिती(गुण २०):—** वार्षिकांकाची निर्मिती चांगली असावी. यात अंकाची एकूण आकर्षकता ठरविताना चार बाबी विचारार्थ घेण्यात येतील. अ) मुखपृष्ठ ब) छपाई क) बांधणी ड) रचना अथवा मजकुराची मांडणी.

**५. संबंधीत शैक्षणिक वर्षाचे संदर्भमान(गुण १५):—** वार्षिकांक प्रसिध्द करताना संबंधित शैक्षणिक वर्षातील महत्वाच्या म्हणजे संस्मरणीय घटना, व्यक्ती, प्रसंग, जन्मशताब्दी व पर्यावरण आदिंची दखल घेतलेली असावी. विषयांची विविधता आणि विशेषता हवी.

**६.वार्षिकांकाचे शिर्षक (गुण०५):—** संबंधित शैक्षणिक सत्रात प्रकाशित होणाऱ्या वार्षिकांकात जाहिराती झालेल्या नसाव्या. ज्या वार्षिकांक जाहिराती प्रसिध्द केल्या असतील अशा वार्षिकांकाचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

तरी आपल्या महाविद्यालयाद्वारे २०२५—२६ या शैक्षणिक सत्रात प्रकाशित झालेल्या वार्षिकांकाच्या १० प्रती प्रस्तृत स्पर्धेसाठी दिनांक ३० जुलै, २०२६ पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात पाठवावे. तसेच दरवर्षी नियमितपणे वार्षिकांक प्रकाशित करावा अशी आपणास विनंती आहे.

**धन्यवाद!**

(डॉ.प्रिया गेडाम)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
## विद्यार्थी विकास विभाग
## आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा

**वार्षिकांकाचे मुल्यांकन करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठन करण्यात यावी.**

| | |
|---|---|
| १. प्र–कुलगुरू | – अध्यक्ष |
| २. कुलसचिव | – सदस्य |
| ३. वित्त व लेखा अधिकारी | – सदस्य |
| ४. विषयतज्ञ( हिंदी विषय तज्ञ) | – सदस्य (भाषा व कला) |
| ५. विषयतज्ञ(मराठी विषय तज्ञ) | – सदस्य (भाषा व कला) |
| ६. विषयतज्ञ(इंग्रजी विषय तज्ञ) | – सदस्य (भाषा व कला) |
| ७. संचालक, विद्यार्थी विकास | – सदस्य–सचिव |

**वार्षिकांकाचे मुल्यांकन व गुणविभागणी समितीची खालील नियमांच्या आधारावर करावी.**

१. **विद्यार्थ्यांचा सहभाग (गुण २०)** : यात प्रमुख वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनींचा सहभाग अपेक्षित आहे. महाविद्यालयांतील सर्व विद्याशाखा आणि वर्ग यांचा सहभाग असावा. सर्व लेखन विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीभूत असावे.

२. **रचनांचा आशय (गुण २०)** : वार्षिकांकात प्रकाशित मजकुर विद्यार्थी/विद्यार्थीनींचा असावा. प्राध्यापकांकडून लेखनाची अपेक्षा नाही. क्वचित लेखन प्रकाशित झालेच तर त्या लेखनाचे मुल्यांकन करण्यात येणार नाही. वार्षिकांकातील लेखन महाविद्यालयात अध्यापन होणाऱ्या भाषेतील असावे. मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व उर्दु इ. गद्य–पद्यात्मक लेखनाचा दर्जा तपासताना त्यातील संपन्न आशयाचा विचार करण्यात येईल.

३. **रचनांची शैली (गुण २०)** : रचनांच्या विषयाची मांडणी शैलीदार असावी. विषय वाचकांपुढे ठेवताना शैली साधी सरळ व अनलंकृत असावी. अलंकारिक असल्यास कृत्रिम असू नये तसेच अनुकरण असू नये.

४. **अंकाची निर्मिती (गुण २०)** : वार्षिकांकाची निर्मिती चांगली असावी. यात अंकाची एकूण आकर्षकता ठरवितांना खालील चार बाबी विचारार्थ घेण्यात येतील.

अ. मुखपृष्ठ

ब. छपाई

क. बांधणी

ड. रचना अथवा मजकुराची मांडणी

Scanned with OKEN Scanner

५. **संबंधित शैक्षणिक वर्षाचे संदर्भभान (गुण २०) :** वार्षिकांक प्रसिध्द करतांना संबधित शैक्षणिक वर्षातील महत्वाच्या म्हणजे संस्मरणीन घटना, व्यक्ती, प्रसंग जन्मशताब्दी व पर्यावरण इ. दखल घेतलेली असावी. विषयाची विविधता आणि विशेषता हवी.

६. संबंधित शैक्षणिक सत्रात प्रकाशित होणाऱ्या वार्षिकांकात जाहिराती प्रकाशित झालेल्या नसाव्या. ज्या वार्षिकांक जाहिराती प्रसिध्द केल्या असतील अशा वार्षिकांकाचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

मा.कुलगुरूंची मान्यता घेऊन प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकाला रू. ७०००/— चे रोख बक्षिस तसेच द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकास रू. ५०००/— व ३०००/— तसेच दोन उत्तेजनार्थ रू. १०००/— प्रति पुरस्कार बक्षिस देण्यात येतील. सोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून पुरस्कृत महाविद्यालयाचा गौरव करण्यात येईल समान गुण प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकाना बक्षीस विभागून देण्यात येईल. वार्षिकांकाचे मुल्यांकन व गुणविभागणी खालील नियमाच्या आधारे करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner